**निशाणी क्र.०१ वरिल आदेश**
(दिनांक २४/०३/२०२६)

सदरचा अर्ज हा अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. सदर अर्जाचे सखोल वाचन केले असता असे दिसते की,मय्यत मो.शफी मो.इसाक शेख हे अर्जदार क्र.१ ते ५ चे वडील होते. ते दिनांक दि.२५/०९/२०२४ रोजी चनई (बु),ता. कोरपना, जि.चंद्रपूर येथे मरण पावले. तसेच मयताची पत्नी नामे वाहेदबी मोहम्मद शफी शेख हया दि.२९/१२/२०२३ रोजी मरण पावल्या. तसेच मय्यत मो.शफी मो.इसाक शेख हे मृत्युसमयी,मौजा–चनई (बु),ता.कोरपना,जि.चंद्रपूर येथील कायमचे रहीवासी होते.

३. सदरचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ५ हे वरिल मय्यतांचे वारस आहेत असे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता न्यायालयात दाखल केला आहे. न्यायालयाचे आदेशानुसार दैनिक वृत्तपत्रात तसेच जाहिरनामा काढुन हरकती मागविण्यात आल्या होत्या.

४. अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री.एन.डी.येरणे वकील साहेब यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. दिनांक ०३/०२/२०२६ रोजीच्या दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्राची अस्सल प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. ती निशाणी ०९ वर आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालय,चनई (बु) येथील नोटीस बोर्डवर देखील दि. ११/०२/२०२६ रोजी जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला होता. यावरुन असे दिसते की,जाहिरनामा

प्रसिध्द केला गेला आहे. त्या जाहिरनाम्यावर दिलेल्या कालावधीमध्ये कोणीही आक्षेप घेतला नाही. यावरुन सदरचा अर्ज हा कोणताही आक्षेप नसल्याचे आढळुन येते.

**६.** सदरचा अर्ज/प्रकरण सिध्द करण्यासाठी अर्जदार क्र.५ मोहम्मद अकील मोहम्मद शफी शेख याने मुळ अर्जातील संपूर्ण वस्तुस्थिती प्रतिज्ञालेखामध्ये पुनरुच्चार केला. तसेच त्यांची आजी नामे जैनाबी मोहम्मद इसाक शेख यांचे निधन झाले असे त्यांनी सांगितले. अर्जदार याच्या पुरावेस कोणीही आक्षेप घेतला नाही. तसेच अर्जदाराचा पुरावा हा खंडन करण्यासारखा नाही. म्हणुन अर्जदार यांच्या प्रतिज्ञालेखातील पुरावा हा ग्राहय धरण्यासाखा आहे. अर्जदाराने मय्यत मो.शफी मो.इसाक शेख व वाहेदबी मोहम्म्द शफी शेख यांच्या मृत्युप्रमाणपत्राची पडताळीत प्रत नि.क्र.११ व १२ वर दाखल केलेली आहे. तसेच अर्जाचे अनुषंगाने अर्जदार क्र.५ मोहम्मद अकील मोहम्मद शफी शेख याने नि.क्र.१० अन्वये शपथपत्र दाखल केले आहे. तसेच मय्यत व अर्जदार यांच्या आधारकार्डची पडताळलेली प्रत नि.क्र.१३ ते १७ वर दाखल केलेली आहे.

**७.** अभिलेखावर दाखल केलेले संपुर्ण दस्तऐवज यास कोणीही आक्षेप घेतला नाही. तसेच अर्जदाराने दाखल केलेले दस्तऐवज हे खंडन करण्यासारखे नाही. अभिलेखावर अर्जदारने दाखल केलेले संपुर्ण दस्तऐवज हे अर्जदारांचे अर्जास व पुराव्यात सुसंगत आहे व ते अर्जदारांच्या अर्जास पुरक आहे. दैनिक वृत्तपत्र 'पुण्यनगरी' या वृत्तपत्रात जाहिरनामा प्रकाशीत केल्यानंतर दिलेल्या मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविला नाही. म्हणुन अर्जदाराचा अर्ज, पुरावा, अभिलेखावरील सर्व दस्तऐवज यावरुन असे आढळुन येते की, अर्जदार हे मय्यतासाठी वारसान प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहे. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

## आदेश

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | बॉम्बे रेग्युलेशन १८२७ VIII चे कलम २ अन्वये **अर्जदार क्र.१ शहनाज बेगम अब्दुल गफ्फार शेख, अर्जदार क्र.२ फयीमापरवीन गफ्फार खान, अर्जदार क्र.३ मो.रफीक मो.शफी शेख अर्जदार क्र.४ नफीसा बेगम अयातुल्ला खान,अर्जदार क्र.५ मोहम्मद अकील मोहम्मद शफी शेख** हे **मय्यत मो.शफी मो.इसाक शेख** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसान प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. |
| ३. | अर्जदारांनी नियमानुसार शुल्क दयावे. |

स्वा/–
(दिक्षा दिलीप सहारे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कोरपना

दिनांक:- २४/०३/२०२६